दि. ०५/०४/२०२५

# पोलीस आयुक्तालय, पुणे शहर

## कारागृह शिपाई (पश्चिम विभाग) भरती प्रक्रिया सन २०२२-२३

### ओएमआर (OMR) आधारीत परिक्षेसाठी बसणा-या उमेदवारांसाठी महत्त्वपूर्ण सूचना

१. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आस्थापनेवरील पश्चिम विभागाकडील कारागृह शिपाई भरती २०२२-२३ प्रक्रियेत कारागृह शिपाई पदाकरीता लेखी परिक्षेस पात्र ७७१२ उमेदवारांची यादी दिनांक ०१/०४/२०२५ रोजी प्रसिध्द केली आहे.

२. ***लेखी परीक्षेच्या वेळेविषयी सूचना :-***

A) लेखी परिक्षा पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे येथे घेण्यात येणार असून लेखी परिक्षा दिनांक ०९/०४/२०२५ रोजी सकाळी ०७.०० वा. घेण्यात येणार आहे. परिक्षा सुरु होण्यापुर्वी २ तास आधी म्हणजेच सकाळी ०५.०० वा परीक्षेच्या ठिकाणी उपस्थित राहावे.

B) सकाळी ०५.०० वा.नंतर कोणत्याही कारणाने उशीर झाला तरीही उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही .

C) उमेदवांराना लेखी परीक्षेकरीता मैदानात प्रवेश देण्यापुर्वी त्यांची बायोमॅट्रीक हजेरी व्दारे तपासणी करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवारांनी परिक्षेच्या ठिकाणी सकाळी ०५.०० वाजता बिनचुक हजर राहावे.

३. लेखी परीक्षेसाठी पात्र उमेदवांराना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र महाआयटी विभागामार्फत ऑनलाईन पध्दतीने डाऊनलोडची सुविधा उपलब्ध केली जाणार आहे. सदर प्रवेशपत्रावर दिलेल्या सुचना उमेदवारांनी काळजी पुर्वक वाचाव्यात.

४. उमेदवारांनी मैदानी चाचणीच्या वेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र व लेखी परीक्षेसाठी दिलेले प्रवेशपत्र सोबत न आणल्यास उमेदवारास लेखी परीक्षेसाठी प्रवेश देण्यात येणार नाही.

५. **पेहरावा विषयी -**

A) पुरुष उमेदवार यांनी परीक्षेस येताना हाफ शर्ट व फुल पॅन्ट याच पेहराव येतील .

B) महिला उमेदवार यांनी ही आक्षेपार्ह अथवा ज्या वस्त्रांचा परीक्षेकरीता दुरुपयोग होईल असा पेहराव करु नये .

C) या व्यतिरिक्त कोणासही हुडी टोपी जॅकेट कोट स्वेटर इत्यादी अंगवस्त्रावर कोणत्याही परिस्थितीत परवानगी दिली जाणार नाही.

६. परीक्षा पारदर्शक व तटस्थ पध्दतीने पार पाडण्यासाठी सर्व स्तरावर सीसीटीव्ही सर्वेक्षण, व्हीडीओ शुटींग, इलेक्ट्रीक डिव्हाईस डिटेक्टरद्वारे उमेदवारांची तपासणी करण्यात येणार आहे. उमेदवाराकडे कोणत्याही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस आढळून आल्यास तसेच परीक्षेच्यावेळी उमेदवार कोणत्याही प्रकारे कॉपी करतांना किंवा इतर उमेदवाराशी बोलतांना/उत्तरे सांगतांना किंवा प्रश्नपुस्तिका अदलाबदल करणे अशा प्रकारचे कोणतेही बेकायदेशीर कृत्य करतांना आढळुन आल्यास किंवा सीसीटीव्ही फुटेज/व्हीडीओ रेकॉर्डीग पडताळणीमध्ये आढळुन आल्यास त्याचेवर कायदेशीर कारवाई

Scanned with OKEN Scanner

करण्यात येईल व संबंधीत उमेदवारास लेखी परीक्षेतुन/भरती पक्रियेतुन बाद ठरवुन त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

७. परीक्षा केंद्रात भ्रमणध्वनी (Mobile Phone)/डिजीटल डायरी/मायक्रोफोन/Micro camera device/ कॅल्क्युलेटर/ digital note pad/ नोटस् पुस्तके/ ईअरफोन hearing aid device/ smart watch इत्यादी तसेच इतर कुठलेही असे साहित्य, ज्यांचा कॉपी करण्यासाठी उपयोग होईल अथवा उपयोग होवू शकतो असे साहित्य आणण्यास सक्त मनाई आहे. असे करणारा उमेदवार आढळून आल्यास त्यास त्याच क्षणी बाद ठरवून त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच त्याचे विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल.

८. ओएमआर (OMR Sheet) विषयी सुचना :-

अ) उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी ओएमआर शिट (उत्तरपत्रिका) पुरविण्यात येणार असुन उत्तरपत्रिकेची तपासणी ओएमआर मशीनद्वारे करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराने ओएमआर शिटवर माहिती भरण्यासाठी व उत्तर चिन्हांकित करण्यासाठी ओएमआर शिटवर दिलेल्या सुचनांचे अतिशय काटेकोर व काळजीपूर्वक वाचन करावे.

ब) ओएमआर उत्तरपत्रिकेत माहिती भरण्यासाठी दिलेल्या सुचनाप्रमाणे उमेदवाराने चेस्ट क्रमांक, प्रश्नपुस्तिका संच क्रमांक अचुक नमुद करावे. माहिती नमुद न केल्यास उत्तरपत्रिकेचे मुल्यांकन होणार नाही.

क) OMR Sheet वर कोणतेही चिन्ह नमूद करु नये/ नाव लिहू नये / खाडाखोड अथवा पुनर्लेखन करु नये. तसे आढळून आल्यास त्या उमेदवारास भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

ड) उमेदवाराने ओएमआर शिटवर (उत्तरपत्रिकेवर) चेस्ट क्रमांक, प्रश्नपत्रिका संच क्रमांक, इत्यादी माहितीचे वर्तुळे गडद केल्याची खात्री केली पाहीजे.

इ) उमेदवारांनी उत्तरपत्रिकेवरील (OMR Sheet) एकापेक्षा अधिक वर्तुळे चिन्हांकित केल्यास, अर्धवट चिन्हांकिंत केलेली वर्तुळे, खाडाखोड केलेले पर्याय, चिन्हांकित वर्तुळास छिद्र पडल्यास अशा उत्तरास गुण दिले जाणार नाहीत. उमेदवाराने खालील दिलेल्या उदाहरणानुसार प्रत्येक उत्तरासाठी केवळ एक वर्तुळ गडद करावे.

९. ***प्रश्नपत्रिका विषयी सूचना :-***

अ) उमेदवारास प्रश्नपत्रिका वाटप झाल्यावर उमेदवाराने प्रश्नपत्रिका परिपूर्ण असल्याची खात्री करावी. प्रश्नपत्रिका अपुर्ण असल्यास तात्काळ सदर बाब पर्यवेक्षक अधिकारी यांचे निदर्शनास आणून दयावी.

ब) प्रश्नपत्रिकेचा संच क्रमांक उत्तरपत्रिकेवर (ओएमआर शिटवर) अचुकपणे न नोंदविल्यास शुन्य गुण देण्यात येतील. प्रश्नपत्रिका संच क्रमांक उत्तरपत्रिकेवर विविध ठिकाणी नमूद करण्यामध्ये त्रुटी राहील्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील. तसेच यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

क) प्रश्नपत्रिका बरोबर असल्याची खात्री करुन त्यावर उमेदवाराने आपला चेस्ट क्रमांक व पूर्ण नांव लिहावे. उमेदवाराने त्याला वाटप करण्यात आलेल्या प्रश्नपत्रिका आपसात अदलाबदल करु नये. तसे केल्याचे आढळुन आल्यास त्यास भरती प्रक्रियेतुन बाद करण्यात येवून त्याचे विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

ड) पर्यवेक्षक अधिकारी हजेरीपटावर उमेदवाराची स्वाक्षरी घेण्यासाठी आल्यानंतर उमेदवाराने त्याला वाटप केलेले उत्तरपत्रिका क्रमांक, प्रश्नपत्रिका संच क्रमांक बरोबर असल्याची खात्री करुन हजेरीपटावर स्वाक्षरी करावी.

इ) परीक्षा सुरु असतांना प्रश्नपत्रिकेत छपाई किंवा इतर कोणतीही वैध अडचण असल्यास संबंधीत पर्यवेक्षक अधिकारी यांना तात्काळ सांगावे.

*इतर महत्वाच्या सुचना :-*

१०.लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र महाआयटीकडून उमेदवारांना ई-मेलद्वारे ऑनलाईन पाठविण्यात आले आहे. उमेदवारांनी त्यांचे प्रवेशपत्र प्राप्त करुन घ्यावे. तसेच लेखी परीक्षेच्यावेळी प्रवेशपत्र घेवून यावे. तसेच प्रवेशपत्रावरील फोटो सारखा एक पासपोर्ट साईज आकाराचा फोटो सोबत घेवून येणे बंधनकारक आहे.

११. प्रवेशपत्राशिवाय उमेदवारांना परीक्षा केंद्रात लेखी परिक्षेकरिता प्रवेश दिला जाणार नाही.

१२.उमेदवारांनी प्रवेशपत्रासोबत स्वतःचे आधारकार्ड/ड्रायव्हींग लायसन्स / कोणतेही शासकीय ओळखपत्र यापैकी किमान एक ओळखपत्र सोबत ठेवणे आवश्यक आहे. सदर ओळखपत्राशिवाय लेखी परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.

१३.परीक्षा केंद्रावर उमेदवारास बॉलपेन व लेखनासाठी पॅड पुरविण्यात येतील. सदर लेखन साहित्य परीक्षा संपल्यावर परत करावे. उमेदवारास प्रवेशपत्र/ओळखपत्राशिवाय अन्य कोणतीही वस्तु सोबत बाळगता येणार नाही.

१४.उमेदवाराने त्यांच्या सोबत आणलेल्या वस्तु/बॅग/मोबाईल इत्यादी स्वतःचे जबाबदारीवर परीक्षा केंद्राच्या बाहेर ठेवाव्यात. सदर वस्तु/साहित्य गहाळ/चोरी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

१५.लेखी परीक्षेसाठी ९० मिनिटांचा वेळ असेल व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाचे १०० गुणांसाठी घेण्यात येणार आहे. लेखी परीक्षेत अंकगणित, सामान्य ज्ञान व चालु घडामोडी, बुध्दीमत्ता चाचणी, मराठी व्याकरण या विषयांचा समावेश असेल.

१६.परीक्षा सुरु झाल्यावर उमेदवाराने आपसात बोलणे ही कृती गैरवर्तन समजण्यात येईल.

१७.परीक्षेचा कालावधी संपल्याची अंतिम सूचना झाल्यावर उमेदवाराने आपसात बोलणे ही कृती गैरवर्तन समजण्यात येईल. त्याकरीता उमेदवारास परीक्षेतून बाद करण्यात येईल.

१८. पर्यवेक्षक अधिकारी सर्व उमेदवारांच्या उत्तरपत्रिका गोळा करुन तपासुन उत्तरपत्रिकेवर स्वाक्षरी करुन उत्तरपत्रिकेतील कार्बन कॉपी उमेदवारास परत करेपर्यन्त उमेदवाराने आपल्या जागेवर बसुन रहावे.

१९.परीक्षा केंद्रात एकदा प्रवेश केल्यानंतर परीक्षा संपेपर्यन्त बाहेर जाण्यास सक्त मनाई राहील.

२०.लेखी परीक्षा झाल्यानंतर नमुना उत्तरपत्रिका (Model answer Sheet/Key) पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

२१.परीक्षा संपल्यानंतर उमेदवार स्वतःची प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिकेची कार्बन कॉपी सोबत घेवून जाऊ शकतील.

*(डॉ. संदीप भाजीभाकरे)*
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय
पुणे शहर

Scanned with OKEN Scanner